महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.३४८/ ०२४५५
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक :- २७/०१/२०१५

# परिपत्रक

विषय : शुक्रवार दिनांक ३०.०१.२०१५ हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्याबाबत.

संदर्भ :शासन परिपत्रक क्र.जपुती २२१५/प्र.क्र.१८/२९, दिनांक २१/०१/२०१५.

....

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्याकरिता दिनांक ३० जानेवारी रोजी संपूर्ण देशभर २ मिनीटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी परिपत्रक क्र.जपुती २२१५/प्र.क्र.१८/२९, दिनांक २१.०१.२०१५ अन्वये ३०.०१.२०१५ रोजी हुतात्मा दिन पाळण्याबाबतच्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर परिपत्रकाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

२. सर्व क्षेत्रीय कार्यालयातील प्रमुखांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये हुतात्म्यांना आदरांजली गंभिरपणे व योग्य त्या आदराने देण्याकरिता उपरोक्त नमूद दि.२१.०१.२०१५ च्या परिपत्रकातील सूचनांचे अवलोकन करून दि.३०.०१.२०१५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता २ मिनीटे मौन (स्तब्धता) पाळून सर्व कार्यालयांमध्ये हुतात्मा दिन पाळण्यात यावा. तसेच सर्व संबंधीतांनी या बाबतच्या सूचना तंतोतंत पाळण्यात येतील याबाबतची दक्षता घ्यावी.

३. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरिलप्रमाणे.

( संदेश हाके )
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

*D:\O&M\Circular-F.N.348.doc*

**शुक्रवार,दिनांक ३० जानेवारी,२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक जपुती २२१५/प्र.क्र.१८/२९**
मंत्रालय,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
तारीख:-२१ जानेवारी,२०१५

## परिपत्रक

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर २ मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार यावर्षीही शुक्रवार दिनांक ३० जानेवारी,२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात यावा. शुक्रवार दिनांक ३० जानेवारी,२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता पाळण्यात यावयाच्या मौन (स्तब्धता) ची सुरुवात होण्यापूर्वी सकाळी ठिक १०.५९ पासून ११.०० वाजेपर्यंत इशारा भोंगा वाजविण्यात येईल. सदर इशारा भोंगा संपल्यानंतर सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/ आस्थापना/ शैक्षणिक संस्था/विद्यापीठे या मधील अधिकारी/ कर्मचारी/ शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी /विद्यार्थी तसेच नागरिक आदी सर्वांनी दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळावे, ठिक ११.०२ मिनिटांनी मौन (स्तब्धता) संपल्यासंबंधीचा इशारा भोंगा ११.०३ मिनीटांपर्यंत वाजविण्यात येईल.

२. जेथे भोंग्याची व्यवस्था नसेल तेथे वरीलप्रमाणे ठिक ११.०० वाजता मौन (स्तब्धता) पाळण्याबाबत योग्य ते निदेश संबंधितांना देण्यात यावेत व हुतात्म्यांना आदरांजली गंभिरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता) पाळून देण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१५०१२११७०५२७३००७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravikant Ganpat Panchal

Digitally signed by Ravikant Ganpat Panchal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ravikant Ganpat Panchal
Date: 2015.01.21 17:15:37 +05'30'

**र.ग.पांचाळ**
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,मलबार हिल,मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक
४. मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई
५. सर्व मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई
६. प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय,मुंबई
७. प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई

८. प्रधान सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई
९. प्रधान सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई,
१०. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन,मुंबई
११. आयुक्त,मुंबई महानगरपालिका,मुंबई
१२. सर्व विभागीय आयुक्त,
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद
१५. पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई
१६. पोलीस आयुक्त,मुंबई/पुणे/नागपूर/ठाणे/औरंगाबाद/नवी मुंबई/सोलापूर/नाशिक
१७. सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
१८. जनरल ऑफीसर कमांडीग,महाराष्ट्र/गुजरात राज्य,मुंबई
१९. एअर ऑफीसर कमांडीग,मेरी टाईम्स एअर ऑपरेशन,महाराष्ट्र
२०. फ्लॅग ऑफीसर कमांडीग,इन चीफ वेस्टर्न कमांड,शहीद भगतसिंग मार्ग,मुंबई
२१. महाव्यवस्थापक,पश्चिम रेल्वे/मध्य रेल्वे,मुंबई
२२. कमांडर जनरल होमगार्ड,मुंबई
२३. सचिव,मुंबई पोर्ट ट्रस्ट,मुंबई
२४. कंट्रोलिंग ऑफीसर,केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल,सांताक्रुझ विमानतळ,मुंबई
२५. महालेखापाल,महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर
२६. महाप्रबंधक,उच्च न्यायालय,मुंबई
२७. प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई
२८. प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई
२९. संचालक,ऑल इंडिया रेडिआ,मुंबई
३०. संचालक,नागरी संरक्षण संचालनालय,जुने सचिवालय, विस्तार, एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई-३२

<u>**त्यांनी या परिपत्रकान्वये इशारा भोंगा वाजविण्याबाबत उचित कार्यवाही करावी,अशी विनंती आहे**</u>

३२.संचालक,दूरदर्शन केंद्र,वरळी,मुंबई
३३.डेप्युटी प्रिंसिपॉल,इन्फॉर्मेशन ब्युरो,भारत सरकार,मुंबई
३४.सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई
३५.अधिपरिक्षक,पुस्तके व प्रकाशने,मुंबई
३६.महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई (त्यांना विनंती की, या कार्यक्रमास दूरदर्शन,आकाशवाणी व वृत्तपत्रे इत्यादि प्रसार माध्यमांद्वारे प्रसिध्दी देण्याची आवश्यक ती कार्यवाही करावी.)
३७.निवडनस्ती/कार्यासन-२९,सामान्य प्रशासन विभाग